# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 07 January 2026
## Time 11.00 to 11.05 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक ०७ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

भारतीय रेल्वे आता जगातल्या सर्वात मोठ्या प्रमाणावर विद्युतीकरण झालेल्या रेल्वे प्रणालींपैकी एक बनली आहे. देशात सुमारे ७० हजार किलोमीटर ब्रॉडगेज मार्गावर रेल्वेगाड्या विजेवर धावत आहेत आणि रेल्वे जाळ्यापैकी ९९ टकक्याहून अधिक भागाचं विद्युतीकरण पूर्ण झालं आहे. २००४ ते २०१४ दरम्यान दररोज दीड किलोमीटर मार्गाचं विद्युतीकरण होत असताना, मागील सहा वर्षांत हा वेग वाढून दररोज १५ किलोमीटरवर पोहचला आहे. तसंच रेल्वे सौर उर्जेचा व्यापक वापर करत असून, नोव्हेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जा क्षमता सुमारे ९०० मेगावॅटवर पोहोचली आहे. भारतीय रेल्वेची ही पर्यावरणपूरक, आधुनिक आणि शाश्वत दिशेने वाटचाल होत असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

भारतीय तटरक्षक दलाच्या समुद्र प्रताप या नव्या जहाजाचा समावेश अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. यामुळे आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला बळ मिळतं, सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत होते आणि शाश्वततेबद्दलची आपली बांधिलकीही अधोरेखित होते, असं त्यांनी नमूद केलं.

****

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या स्टार्टअप ॲक्सिलरेटर उपक्रम WaveX ने मीडिया, मनोरंजन, प्रसारण आणि संप्रेषण तंत्रज्ञान क्षेत्रात नवोन्मेष आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी आयआटी दिल्लीच्या Foundation for Innovation and Technology Transfer (FITT) सोबत सामंजस्य करार केला आहे. नवी दिल्लीत माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला. या सहकार्याअंतर्गत FITT हे WaveX कार्यक्रमाच्या अंमलबजावणी आणि विस्तारासाठी महत्त्वपूर्ण पाठबळ देणार आहे. या उपक्रमामुळे मीडिया आणि टेक क्षेत्रातल्या स्टार्टअप्ससाठी नव्या संधींची दारं खुली होणार आहेत.

****

विकसित भारताच्या निर्मितीसाठी तसंच देशाच्या शाश्वत सामाजिक आणि आर्थिक भविष्यासाठी कुपोषणाच्या समस्येचं निराकरण करणं आवश्यक असल्याचं, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय दुग्धव्यवसाय विकास मंडळातर्फे नवी दिल्लीत आयोजित सी एस आर परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. कुपोषणाची मूळ कारणं दूर करण्यात महिला आणि बाल विकास मंत्रालयाची भूमिका महत्त्वाची आहे, असं त्यांनी सांगितलं. गर्भवती आणि मुलांच्या वाढत्या वयात पोषण चांगलं झालं, तर निरोगी पिढी तयार होते, असंही त्यांनी त्यांनी नमूद केलं.

****

छत्तीसगडच्या धमतारी जिल्ह्यात काल एका नक्षली महिलेनं आत्मसमर्पण केलं, तिच्यावर पाच लाख रुपयांचं बक्षीस होतं. भूमिका, उर्फ सोमारी नावाच्या या महिलेचा अनेक नक्षली कारवायांमध्ये सहभाग होता. तसंच नक्षलवाद्यांच्या गोबरा या संघटनेची कमांडर म्हणून तिने काम केलं होतं.

****

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या सांगण्यावरून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारले नसल्याचा दावा करत आठ जणांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. राज्य निवडणूक आयोग आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना उमेदवारी अर्ज स्वीकारण्याचे आदेश देण्याची मागणी त्यांनी याचिकेत केली आहे. मुंबईतल्या २२४ ते २२७ क्रमांकाच्या प्रभागातून याचिकाकर्ते अर्ज भरण्यासाठी इच्छुक होते. नार्वेकर यांचे बंधू मकरंद नार्वेकर, वहिनी हर्षिता नार्वेकर आणि बहीण गौरी शिवलकर या प्रभागातून निवडणूक लढवत आहेत.

****

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ७-८ वर्षांनंतर होत असूनही मोठ्या प्रमाणावर बिनविरोध उमेदवार निवडून येणं म्हणजे मतदारांचा अधिकार हिरावून घेणं आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी केली. यात धमक्या देणं, पैशांचा वापर, उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दबाव टाकणं, बोगस मतदान आणि मतदारांना दिली जाणारी प्रलोभनं सातत्यानं समोर येत असून, निवडणूक आयोगाचं याकडे दुर्लक्ष होणं जास्त चिंताजनक आहे, असं सुळे म्हणाल्या.

****

दीव मध्ये दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धा सुरू आहेत. बीच पेंचक सिलटमध्ये मुंबईच्या क्रीनाशी येवलेने सलग दुसऱ्या वर्षी कांस्य पदकाची कमाई केली. महिलांच्या बीच कबड्डीत हरियाणाकडून ४७-२६ गुणांनी महाराष्ट्र पराभूत झाला. बीच सॉकरमधील साखळीतील सलग दोन पराभवामुळे राज्याचा महिला संघ स्पर्धेतून बाहेर पडला.

****

मलेशियात क्वालालंपूर इथं सुरू असलेल्या मलेशिया खुल्या सुपर सेव्हन फिफ्टी बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेननं सिंगापूरच्या खेळाडुचा २१ – १६, १५ – २१, २१ – १४ असं हरवून पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. महिला एकेरीतही पी व्ही सिंधूने चायनीज तैपेईच्या खेळाडुचा २१–१३, २२–२० असं पराभूत करत पुढची फेरी गाठली. तर दुसरीकडे महिला एकेरीत मालविका बनसोडचा पहिल्या फेरीत पराभव झाला.

****

उत्तर भारतात थंडीची लाट कायम असून, दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, राजस्थान आणि मध्य प्रदेशसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. कडाक्याची थंडी आणि दाट धुक्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं असून, राजस्थान आणि वाराणसीमध्ये शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

****